केंद्र शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा >> पान 2

प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते आज राज्यातील विविध प्रकल्पांचे उद्घाटन >> पान 3

शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली
रविकांत तुपकर यांची सरकारच्या पॅकेजवर तीव्र प्रतिक्रिया >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 73 ■ बुधवार, दि. 08 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**
आत्म-सुधारणा नेहमी चालू ठेवा.



भारतीय सैन्याने मल्याळम सुपरस्टार मोहनलाल यांना सम्मानित केले:अभिनेत्याने आभार व्यक्त केले, म्हणाला- मला खूप आनंद आणि अभिमान वाटतोय
आतील पान

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३१ हजार ६२८ कोटींचे पॅकेज - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## आतापर्यंतची सर्वात मोठी आर्थिक मदत



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. यामध्ये २९ जिल्हे प्रभावित झाले आहेत. या जिल्ह्यांतील नुकसानग्रस्त २५३ तालुके आणि २०५९ मंडळांमध्ये मदतीसाठी ६५ मिलीमिटर पावसाची अट न ठेवता शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नुकसानग्रस्त भागातील बळीराजाला पुन्हा उभे करण्यासाठी ३१ हजार ६२८ कोटींच्या मदतीचे पॅकेज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जाहीर केले. या पॅकेजनुसार कोरडवाहू शेतीसाठी प्रति हेक्टरी १८ हजार ५०० रुपये, हंगामी बागायतीसाठी २७ हजार रुपये तर बागायतीसाठी प्रति हेक्टरी ३२ हजार ५०० रुपये मदत दिली जाणार आहे. जाहीर करण्यात आलेली मदत दिवाळीपूर्वी देण्याचा प्रयत्न राहणार असून ही आतापर्यंतची सर्वात मोठी आर्थिक मदत असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी देऊ केलेल्या मदतीची माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अतिवृष्टीमुळे शेती आणि शेतकऱ्यांसह पिके, जनावरे, गोठे, दुकाने, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही जणांचे मृत्यूही झाले आहेत. मंत्रिमंडळातील सदस्यांनी काही ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करुन नुकसानग्रस्तांना तातडीची १० हजार रुपयांची मदत, गहू, तांदूळ आदी देण्यात आले. यासाठी २२०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता तातडीने मंजूर करण्यात आला. विमाधारक शेतकऱ्यांना लवकर मदत मिळवून देण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान स्वत: प्रयत्न करीत असून विमाधारकांव्यतिरिक्त इतर शेतकऱ्यांनाही १७ हजार रुपये प्रति हेक्टरी इतकी रक्कम दिली जाणार आहे. या भरपाईसाठी १८ हजार कोटींहून अधिकची तरतूद केली जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात एक कोटी ४३ लाख ५२ हजार २८१ हेक्टर क्षेत्रावर पीक लागवड झाली. त्यापैकी ६८ लाख ६७ हजार ७५६ हेक्टर क्षेत्रावर अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. ज्या ठिकाणी घरांचे नुकसान झाले, तिथे नव्याने घरे बांधण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मदत करण्यात येणार आहे, तर डोंगरी भागात घरे बांधण्यासाठी अतिरिक्त १० हजारांची मदत देण्यात येईल. तसेच ज्या दुकानांचे नुकसान झाले असेल त्यांना ५० हजार रुपये, >> पान २

### संकट काळात बळीराजाच्या मदतीसाठी शासन तत्पर : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

अस्मानी संकटामुळे खचलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. पूरग्रस्त भागात नुकसानीसाठी तातडीची १० हजाराची मदत देण्यात आली आहे. अशा संकट काळात अन्नदाता बळीराजाच्या मदतीसाठी शासन धावून आले आहे. सर्व अटी शर्ती बाजूला ठेवत शेतकरी हिताला शासनाचे प्राधान्य असून शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासन तत्पर आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले.



उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यात ६५ लाख हेक्टर जमिनीवर शेतीचे नुकसान झाले आहे. जमीन खरडून गेल्यामुळे भविष्यात पीक घेण्याचे संकट शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे. मात्र शेतकऱ्यांनी काळजी करायची गरज नसून शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. पूरग्रस्त भागातील नागरिकांना पुन्हा उभे करण्यासाठी शासन सर्व उपाययोजना करीत आहे. खरडून गेलेल्या जमिनींना प्रति हेक्टरी ४७ हजार रूपये मदत देण्यात येणार आहे. तसेच मनरेगा (महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना) मधून तीन लाख रूपये प्रति हेक्टरी देण्यात येतील.

रब्बीच्या हंगामासाठी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १० हजाराची मदत मिळणार आहे. केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर झाल्यानंतर केंद्रही शेतकऱ्यांना मदत करणार आहे. केंद्र शासनही शेतकऱ्यांच्या पाठीशी असून शेतकरी सन्मान योजनेतून मदत करीतच आहे. राज्य शासनही नमो शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून वार्षिक सहा हजार रूपयांची मदत देत आहे. या मदतीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्याला पुन्हा उभे राहण्यास निश्चितच मदत मिळणार असल्याची खात्रीही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.

### एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना तीन हेक्टरपर्यंत मदत : उपमुख्यमंत्री अजित पवार

राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीमुळे शेतकरी चिंताग्रस्त असून त्याच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे. नुकसानग्रस्त प्रत्येक शेतकऱ्याला मदत करण्याची शासनाची भूमिका आहे. शेतकऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे दोन हेक्टरपर्यंत मदतीचे निकष बाजूला ठेवून तीन हेक्टरपर्यंत मदत करण्यात येणार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.



पावसामुळे आलेल्या पुरात शेतजमिनी खरडून गेल्या ओहत. अनेक शेतकऱ्यांची जनावरे मृत पावली असून गोठ्यांचेही नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी शासन पॅकेजच्या माध्यमातून भरीव मदत करीत आहे. या मदतीपासून कुणीही वंचित राहणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे. तरीही कुणी मदतीपासून राहून गेले असल्यास त्यांनाही निश्चित मदत करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

### हायकोर्टाने हैदराबाद गॅझेटियरसंदर्भात याचिका फेटाळताच लक्ष्मण हाके आक्रमक; सरकारला इशारा



**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत मोठे आंदोलन झाले. या आंदोलनाचा परिणाम म्हणून शासनाने हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतला, ज्याअंतर्गत कुणबी मराठा समाजाला ओबीसी वर्गातून आरक्षण देण्यात आले. मात्र, या निर्णयाला ओबीसी नेते आणि संघटना विरोध करत न्यायालयात गेले होते. परंतु, मुंबई उच्च न्यायालयाने २ सप्टेंबरच्या शासन निर्णयावर अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिल्यामुळे मराठा समाजाला मोठा दिलासा मिळाला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने शासन निर्णयाला अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिल्याने याचा फटका आगामी निवडणुकीत ओबीसी आरक्षणाला बसणार असून हा राज्यातील ओबीसी नेत्यांना मोठा धक्का आहे. त्यामुळे आता सरकारने तातडीने प्रतिज्ञापत्र सादर करावे अन्यथा निवडणुका लांबवाव्यात अशी भूमिका ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मांडली आहे. तर हा मनोज जरांगे पाटील यांचा विजय नसून अजून कुठलाही निकाल लागलेला नाही, असा दावाही हाके यांनी केला आहे. >> पान २

### तुकडाबंदी अधिनियमातील सुधारणेस मंजुरी

#### मंत्रिमंडळ बैठकीत ९ महत्त्वाचे निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी:** तुकडे बंदी कायद्यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेले जमिनींचे व्यवहार आता सुलभ होणार आहेत. तुकडे बंदी कायद्यामध्ये सुधारणा करण्याचा महत्त्वाचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. त्यानुसार महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत आणि त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

तुकडे बंदी अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत आणि त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. अधिनियमातील कलम ८ (ब) चे परंतुक वगळून कलम ९ मध्ये पोट-कलम (३) नंतर परंतुक समाविष्ट करण्यात येणार.

मालकी हक्क मिळणे होणार सुलभ

शेत जमिनींचे लहान तुकडे होण्यापासून रोखण्यासाठी आणि किफायतशीर शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात तुकडे बंदी नियम लागू करण्यात आला होता.

या नियमानुसार किमान १० गुंठ्यापेक्षा कमी जमिनीची खरेदी विक्री करता >> पान २

### कोकणवासीयांसाठी शरद पवारांची रेल्वे मंत्र्यांकडे महत्त्वाची मागणी, एक्स्प्रेस गाड्यांसंदर्भात पत्र



**मुंबई/प्रतिनिधी:** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना एक पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी कोकणवासीयांसाठी विशेष मागणी केली आहे. सिंधुदुर्ग हा भारतातील पहिला पर्यटन जिल्हा असून, आपल्या निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्यांसाठी, ऐतिहासिक किल्ल्यांसाठी आणि समृद्ध कोकणी वारशासाठी प्रसिद्ध आहे. यासाठी कुडाळ, कणकवली व सावंतवाडी या स्थानकांवर एक्स्प्रेस गाड्यांना थांबा देण्याची विनंती त्यांनी या पत्राच्या माध्यमातून केली आहे.

आपल्या पत्रात खा. शरद पवार म्हणालेत की, सिंधुदुर्ग हा भारतातील पहिला पर्यटन जिल्हा >> पान २

# सप्टेंबरचा जीआर रद्द होणार नाही

## हैदराबाद गॅझेटियरविरुद्धच्या याचिकेवर हायकोर्टाचं निरीक्षण

**मुंबई/प्रतिनिधी : मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मुंबईत मराठा समाजाचे आरक्षणाच्या मागणीसाठी मोठे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे फलित म्हणजे शासनाने हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, हैदराबाद गॅझेटिरयच्या आधारे कुणबी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात आलं आहे. मात्र, या निर्णयाला ओबीसी नेत्यांनी, संघटनांनी विरोध करत न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, २ सप्टेंबरच्या शासन निर्णयाला अंतरिम स्थगिती देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिल्याने मराठा समाजाला मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच, राज्य सरकारने केलेल्या युक्तिवादानंतर उच्च न्यायालयाने हैदराबाद गॅझेटियरच्या शासन आदेशाला स्थगिती देण्यास नकार दिल्यामुळे राज्य सरकारला देखील मोठा दिलासा मिळाला आहे.**

हायकोर्टाचे मुख्य न्या. चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीला मान्यता देणाऱ्या शासन निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयास याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, हायकोर्टाने या याचिकांवर सुनावणी करताना सरकारला दिलासा दिला आहे. राज्यातील कुणबी सेना, महाराष्ट्र माळी समाज महासंघ, अहिर सुवर्णकार समाज संस्था, महाराष्ट्र नाभिक महामंडळ आणि सदानंद मंडलिक यांच्याकडून हैदराबाद गॅझेटिरविरुद्ध रीट याचिकांच्या माध्यमातून शासन निर्णयाला आव्हान देण्यात आलं होतं. या याचिकांसंदर्भात



आज सुनावणी झाली, त्यावर २ सप्टेंबरचा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी फेटाळून लावली आहे. राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेला हैदराबाद गॅझेटियरचा शासन निर्णय असंवैधानिक असून तो रद्द करण्याची मागणी याचिकाकर्त्यांनी केली होती.

दरम्यान, २ सप्टेंबर रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयावरील अंतरिम स्थगितीची मागणी फेटाळताना प्रदीर्घ सुनावणीनंतरच याबाबत फैसला देणं शक्य असल्याचंही न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. राज्य सरकारला तातडीने किंवा काही आठवड्यात उत्तर देण्याचे निर्देश देण्यास सांगता येणार नाही, असे म्हणत मुंबई उच्च न्यायालयाने पुढील सुनावणी चार आठवड्यांनी होणार असल्याचे स्पष्ट केले. दरम्यान, कोर्टाच्या निर्णयापर्यंत शासन >> पान २

## भारताचा संरक्षण दलाचा मानबिंदू : भारतीय वायू दल

आज ८ ऑक्टोबर, दरवर्षी ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय वायुसेना दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा केला जातो. यावर्षी आपण आपला ९३ वा वायुसेना दिन साजरा करत आहोत. भारतीय वायू सेनेचे महत्व लोकांना कळावे आणि लोकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी हा दिवस साजरा केला जातो. भारतीय वायुसेना ही भारतीय संरक्षण दलांच्या पाच मुख्य विभागांपैकी एक असून तिच्यावर भारताच्या वायुक्षेत्राचे रक्षण करण्याची व भारतासाठी हवाई युद्ध करण्याची जबाबदारी आहे. भारतीय हवाई दल जगातल्या पहिल्या पाच उत्कृष्ट दलातील एक मानले जाते. ८ ऑक्टोबर, १९३२ रोजी भारतीय वायुसेनेची स्थापना युनायटेड किंगडमच्या रॉयल एअरफोर्स ची सहाय्यक कंपनी म्हणून करण्यात आली. भारतीय वायुसेनेने पहिले स्क्वाड्रन तयार केले आणि ८ ऑक्टोबरला ते मिशन पूर्ण केले. त्यानंतर वायुसेनेने अनेक पराक्रम केले. अल्पावधीतच भारतीय वायुसेना जगातील सर्वात शक्तिशाली वायुसेना बनली. तेव्हापासून ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय नौसेना दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी हवाई दलात योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान केला जातो. यादिवशी भारतीय वायू सेनेकडून परेड, एअर शो सादर केले जातात. मागील वर्षी उत्कृष्ट कामगिरी केलेल्या योद्ध्यांना या दिवशी पुरस्कार दिला जातो. त्यांचा यथायोग्य सन्मान केला जातो. सुब्रोतो मुखर्जी हे भारतीय वायू दलातील स्क्वाड्रनचे पहिले प्रमुख होते. १२ मार्च १९४५ रोजी वायुदलाचे नाव रॉयल इंडियन एअर फोर्स झाले. सुरुवातीला भारतीय वायुदलाकडे खूप कमी विमाने आणि साधनसामुग्री होती. १९४७ मध्ये विमानांना पिस्टनवर चालणारी इंजिने बसवलेली असत. जेट इंजिनांच्या आगमनानंतर त्याची जागा वेगवान जेट विमानांनी घेतली. प्रथम नॅट, हंटर, कॅनबेरा यासारखी ब्रिटिश बनावटीची विमाने वायुसेनेत सहभागी केली गेली. त्या नंतर तंत्रज्ञानाच्या कसोटीवर त्यांची जागा फ्रेंच बनावटीच्या विमानाने घेतली. भारतीय परराष्ट्र धोरणामुळे आणि रशियाने उत्तम सहकार्य केल्याने दणकट बनावटीची रशियन बनावटीची लढाऊ आणि मालवाहू विमाने सहभागी करण्यात आली. तसेच रशियन हेलिकॉप्टर्स सहभागी करण्यात आली. सद्य काळात आधुनिक रडार यंत्रणा, क्षेपणास्त्रे, दळणवळण यंत्रणा, नेटवर्क सेंट्रिक वॉरफेअर सी-४ आय ही संगणक प्रणाली वायुसेनेकडे आहेत. हवेतल्या हवेत इंधन पुरवठा करणारी विमाने, विमानातून रडार वापरून दूर अंतरावरील शत्रूच्या विमानांची टेहळणी करणारी यंत्रणा, कक्षेबाहेरील शत्रूच्या ठिकाणाचा वेध घेणारी इत्यादी अत्यंत आधुनिक शस्त्रास्त्रे सेनेत सहभागी करण्यात आली आहेत. आज भारतीय वायू दल जगातील सर्वात शक्तिशाली वायू दल समजले जाते. भारतीय वायू दल जातील चौथ्या क्रमांकाचे सामर्थ्यशाली वायू दल आहे. अमेरिका, रशिया आणि चीन पाठोपाठ भारताचेच वायू दल सर्वात मोठे वायू दल आहे. भारतीय वायू दलाची कामगिरी १४५ कोटी भारतीयांना अभिमान वाटावी अशी दैदिप्यमान आहे. ज्या ज्या वेळी देशाकडे शत्रूने वाकड्या नजरेने पाहिले त्या त्या वेळी भारतीय वायू दलाने उत्तुंग कामगिरी करून शत्रू राष्ट्राला दाती तृण धरायला लावले. १९४७/४८, १९६२, १९६५, १९७१, १९९९ साली झालेले कारगिल युद्ध किंवा नुकतीच झालेली ऑपरेशन सिन्दुर मोहीम या सर्व युद्धात भारतीय वायू दलाने महत्वाची भूमिका बजावली. भारतीय वायू दल हा भारतीय संरक्षण दलाचा मानबिंदू आहे. भारतीय वायू दल दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

# केंद्र शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी 'दिशा' समितीच्या बैठकीत दिले निर्देश







**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** केंद्र शासनाच्या योजना तळागळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री तथा 'दिशा' समितीचे अध्यक्ष ना. प्रतापराव जाधव यांनी प्रशासनाला दिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण अर्थात 'दिशा' समितीची बैठक जिल्हा नियोजन समिती सभागृहात मंगळवारी पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, प्रकल्प अधिकारी पी.एस.कोळसे यांच्यासह उपविभागीय अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी या बैठकीत केंद्र सरकारच्या योजनांच्या प्रगतीचा तब्बल चार तास सविस्तर आढावा घेतला. यात त्यांनी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करण्याआधी प्रस्तावित जागेत रस्ते, वीज, पाणी यासह मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सर्वेक्षण करावे. लोकांच्या तक्रारी येता कामा नये. प्रस्तावित पुनर्वसन गावांमध्ये दर्जेदार व चांगल्या सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी नव्याने कार्यपद्धती अवलंबण्याबाबत शासनाला पाठवलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले.

ते पुढे म्हणाले, पीक विमा नुकसान भरपाईपासून पात्र शेतकरी वंचित राहु नये. ई-केवायसी अभावी पीक विमा मोबदल्यापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांच्या नावांची यादी ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करुन त्याचे चावडी वाचन करावे. फळबाग पीक विमा नुकसान भरपाई प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करा. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत ई-केवायसीबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. ई-केवायसी करण्यासाठी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करावा, अशा सूचना केंद्रीय राज्यमंत्री ना. जाधव दिल्या.

केंद्रीय राज्यमंत्री ना. जाधव यांनी आढावा घेतांना पीएम- सूर्यघर मोफत वीज योजनेचा प्रचार प्रसार करा. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पांना गती द्या. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विशिष्ट मोटार पंप खरेदी करण्याबाबत सक्ती करु नका. त्यांना मोटार पंप खरेदीचे स्वातंत्र्य द्या. अतिवृष्टी, वादळवाऱ्यामुळे ज्या शेतकऱ्यांच्या सौर पॅनलचे नुकसान झाल्याच्या तक्रारी असून त्यांच्या तक्रारींचे निरसन करा. मनरेगा योजनेंतर्गत जास्तीत जास्त लोकहिताचा कामे वाढवा, सिंचन विहिरी बाबतीत गैरव्यवहार व पैशांसाठी लाभार्थ्यांची अडवणूक होत असल्याच्या तक्रारी असून याला आळा घालावे. सिंचन विहिर मंजुरीपासून ते काम पूर्ण होईपर्यंतच्या प्रक्रियेचा कालबद्ध कार्यक्रम राबवा. याबाबत लोकांमध्ये जनजागृती करावी. मनरेगाअंतर्गत ग्रामपंचायत भवन, स्मशानभूमी आणि शाळांच्या वर्गखोल्यांचे बांधकाम करा. जिल्हा व उपजिल्हा सामान्य रुग्णालयाप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्रात आयुष विभाग सुरु करा. आयुष विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्या. आयुष्मान भारत कार्ड वितरणाचे उद्दिष्ट पूर्ण करा. लाभार्थ्यांना माहिती द्या. पीएम पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पोषण आहार दिले जाते का याची तपासणी करा. भारतनेटचा वापर खासगी यंत्रणा वापरत असेल तर ती तात्काळ बंद करा. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये इंटरनेट सेवा सुरु करा. अडीअडचणीबाबत तपासणी करा व गट विकास अधिकाऱ्यांनी बैठका घेवून उपाययोजना कराव्यात. डिजिटल इंडिया अंतर्गत ग्रामपंचायती डिजिटल करुन लोकांना सेवा द्या. सीएससी सेंटर, आधार सेवा केंद्रांवर नागरिकांची लुट सुरु असल्याच्या तक्रारी असून अशा केंद्रांची तपासणी करा, आढावा घेवून कारवाई करा, अशा सूचना केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकीत केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प, पुनर्वसन, प्रधानमंत्री पीक विमा योजना, पीक विमा नुकसान भरपाई, पीक कापणी प्रयोग पद्धती, फळबाग पीक विमा, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, पीएम- सुर्यघर मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, १५ वा केंद्रीय वित्त आयोग निधी व खर्च, प्रधानमंत्री आवास योजना, अटल भूजल, राष्ट्रीय आरोग्य अभियान, पीएम पोषण शक्ती निर्माण योजना, पीएम श्री शाळा, अंगणवाडी केंद्र बांधकाम, भारतनेट, डिजिटल इंडिया, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे स्थानक, उड्डाण पुलांच्या कामांचा सविस्तर आढावा घेतला.

## तरुणीच्या मोहजालात अडकून वकिलाने गमावले दीड कोटी

**मुंबई/प्रतिनिधी:** २८ वर्षीय तरुणीच्या मोहजालात अडकणे एका प्रथितयश वकिलाला चांगलेच महागात पडले आहे. या तरूणीने आधी गोड बोलून आणि नंतर अील छायाचित्रांच्या आधारे धमकावून तब्बल दीड कोटी रुपये उकळले. यात तिचे कुटुंबियही सामील होते. याप्रकरणी पोलिसांनी सदर तरूणीसह चौघांविरोधात गुन्हे दाखल केला आहे. तर्क ारदार वकील ५२ वर्षाचे असून पश्चिम उपनगरात वास्तव्यास राहतात. मे २०२४ मध्ये एका कार्यर्क मात वकिलाची एका तरूणीबरोबर भेट झाली. ती मूळची हिमाचल प्रदेशातील असून मॉडलींग करत होती. वकील ६ जून रोजी परदेशात गेले होते. त्यावेळी तरुणीने त्यांना फोन केला. एक नातेवाईक आजारी असून त्यासाठी ५० लाख रुपये मागितले. त्यावेळी वकिलाने आपल्या खात्यातून अडीच लाख रुपयांची मदत केली.



पान १ वरून...

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या

मृत्यूमुखी पडलेल्या जनावरांसाठी तीन जनावरांची अट न ठेवता प्रति जनावर ३७ हजार ५०० रुपये तर १०० रुपये प्रति कोंबडी अशी भरपाई देण्यात येईल. जमीन खरडून गेलेली शेती पुन्हा लागवडीयोग्य होण्यासाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टरी थेट मदत तर तीन लाख रुपये मनरेगा मधून दिले जातील. बाधित विहिरींसाठी विशेष बाब म्हणून प्रति विहीर ३० हजार रुपये देण्यात येतील. त्याचप्रमाणे मत्स्यशेती तसेच बोटींच्या नुकसान भरपाईसाठी १०० कोटींची तरतूद केल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांना मदत देताना ॲग्रीस्टॅकमधील माहिती ग्राह्य धरली जाईल. त्यासाठी कुठलीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी १० हजार कोटी रुपये, तसेच पूरग्रस्तांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतील पाच टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे. या माध्यमातून १५०० कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या भागात टंचाई परिस्थितीत लागू असलेल्या सर्व सवलती ओली टंचाई समजून लागू करण्यात येणार आहेत. बळीराजा वीज सवलत योजनेमुळे कृषी पंपांना आधीच वीज देयक माफ केले आहे, त्यामुळे वीज देयकाची वसूली होणार नाही.

या अभूतपूर्व संकटात मुख्यमंत्री सहायता निधीसाठी मोठ्या प्रमाणात मदत येत असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले अनेकांनी सामाजिक उत्तरदायित्व निधी देण्याचेही मान्य केले. जी मदत नियमांमध्ये बसणार नाही अशा प्रकरणी मुख्यमंत्री सहायता निधीमधून देण्यात येईल. पुरामुळे कागदपत्रे, शैक्षणिक साहित्य वाहून गेलेल्या एकाही विद्यार्थ्याचे शिक्षण बाधित होणार नाही, याची दक्षता घेतली जाणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी आवर्जून सांगितले.

**असे आहे पॅकेज**

मृतांच्या कुटुंबीयांना: ४ लाख प्रत्येकी, जखमी व्यक्तींना : ७४ हजार रुपये ते २.५ लाख रुपये, घरगुती भांडे, वस्तूंचे नुकसान: पाच हजार रुपये प्रति कुटुंब, कपडे, वस्तूंचे नुकसान: पाच हजार रुपये प्रतिकुटुंब, दुकानदार, टपरीधारक: ५० हजार रुपये, डोंगरी भागात पडझड, नष्ट पक्क्या घरांना : एक लाख २० हजार रुपये, डोंगरी भागात पडझड, नष्ट कच्च्या घरांना : एक लाख ३० हजार रुपये, अंशतः पडझड: ६,५०० रुपये, झोपड्या: आठ हजार रुपये, जनावरांचे गोठे: तीन हजार रुपये, दुधाळ जनावरे: ३७,५०० रुपये, ओढकाम करणारी जनावरे: ३२ हजार रुपये, कुक्कुटपालन: १०० रुपये प्रति कोंबडी.

निकषापेक्षा अधिकची मदत देण्यासाठी १० हजार कोटी रुपये अतिरिक्त, खरडून गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टर थेट मदत आणि मनरेगाअंतर्गत तीन लाख रुपये प्रतिहेक्टर, खचलेली किंवा बाधित विहीर: ३० हजार रुपये प्रति विहीर, तातडीच्या मदतीसाठी १५०० कोटी रुपये जिल्हा नियोजन निधीमध्ये राखीव.

**दुष्काळी सवलती लागू**

जमीन महसुलात सुट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेती कर्ज वसुलीला स्थगिती, शाळा, महाविद्यालय परीक्षा शुल्कात माफी, रोहयो कामात शिथिलता, शेती पंपाची वीज जोडणी खंडित न करणे.

## तुकडाबंदी अधिनियमातील

येत नव्हती. त्यामुळे हा कायदा रद्द करण्याची मागणी सातत्याने होत होती. त्याची दखल घेत तुकडे बंदी कायदा सुधारणा करण्यात आली आहे.

महानगरपालिका, नगरपालिका, नगर पंचायत, प्राधिकरण क्षेत्रे, तसेच गावठाणालगत २०० ते ५०० मीटरपर्यंतचा भाग या निर्णयात समाविष्ट केला जाणार आहे.

महानगरपालिकांच्या सीमेलगत दोन किलोमीटरपर्यंतचा भागदेखील 'एसओपी'मध्ये विचारात घेतला जाणार आहे.

सध्या ५० लाखांहून अधिक कुटुंबांना तुकडेबंदी कायद्यामुळे अडचणींना सामोरे जावे लागत होते.

याचा विचार करून १ जानेवारी २०२५ पर्यंत झालेला एक गुंठा आकारापर्यंतचे तुकडे कायदेशीर केले जातील.

या निर्णयामुळे नागरिकांना रजिस्ट्री, बांधकाम परवाने आणि मालकी हक्क मिळवणे शक्य होईल.

**तुकडेबंदी कायद्यामुळे काय फायदा होणार?**

१. तुकडेबंदी कायद्यामुळे आता रहिवासी क्षेत्रात एक गुंठा जमिनीचा तुकडा पाडता येईल. या निर्णयामुळे शेतकरी, सामान्य जमीनधारक आणि लहान प्लॉट घेणाऱ्या लाखो जमीन मालकांना या नियमाचा फायदा होणार आहे.

२. तुकडेबंदी कायद्यामुळे अनेक वर्षांपासून लहान जमिनींचे व्यवहार रखडले होते. मात्र, हा कायदा रद्द झाल्याने हे व्यवहार आता मार्गी लागणार आहेत.

३. तुकडेबंदी कायद्यामुळे तुम्हाला जमिनीचे लहान तुकडे करुन कोणाला विकता येत नव्हते. लहान प्लॉट शेतीयोग्य नसतात. त्यामुळे शेतीचे तुकडे करणे योग्य नाही, असे सरकारचे म्हणणे होते. मात्र, आता ही परिस्थिती बदलणार आहे.

४. ज्या ठिकाणी नागरी क्षेत्र निर्माण झालं आहे, त्याठिकाणी आपण तुकडेबंदी कायदा आपण १ गुंठापर्यंत निरस्त करणार आहोत, असा निर्णय सरकारने घेतला आहे

## कोकणवासीयांसाठी शरद पवारांची

असून, आपल्या निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्यांसाठी, ऐतिहासिक किल्ल्यांसाठी आणि समृद्ध कोकणी वारशासाठी प्रसिद्ध आहे. मात्र, अनेक लांब पल्ल्याच्या एक्सप्रेस गाड्या सध्या या जिल्ह्यातून न थांबता जात असल्याने येथील नागरिक, विद्यार्थी, व्यावसायिक आणि पर्यटक यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे निवडक एक्सप्रेस गाड्यांना कुडाळ, कणकवली किंवा सावंतवाडी या स्थानकांवर थांबे देण्यात यावेत असे ते या पत्रात म्हणाले आहेत.

प्रायोगिक तत्त्वावर पर्यटन हंगामात व प्रमुख सणांच्या काळात जसे की गणेश चतुर्थी, दसरा, दिवाळी, नववर्ष, होळी आणि उन्हाळी सुट्टी दरम्यान याची अंमलबजावणी करा. यामुळे या भागातील पर्यटनाला चालना मिळेल, विद्यार्थी, व्यावसायिक आणि रुग्ण यांच्या प्रवासात सोय होईल. स्थानिक उत्पादने व हस्तकलेच्या वाहतुकीला प्रोत्साहन मिळेल. तसेच सामान्य जनतेच्या मागणीला योग्य न्याय मिळेल असे ते म्हणाले आहेत.

अरबी समुद्राच्या निळ्याशार पाण्यात सिंधुदुर्ग किल्ला महाराष्ट्राच्या सागरी वारशाचे भव्य प्रतीक म्हणून उभा आहे. मालवणच्या किनाऱ्याजवळ वसलेला हा ऐतिहासिक सागरी किल्ला मराठ्यांच्या सागरी सत्तेचे अद्भुत उदाहरण आहे. हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात बांधला. परकीय सागरी आक्रमणांपासून संरक्षण मिळावे म्हणून त्याचे बांधकाम कौशल्यपूर्ण तंत्राने केले गेले. मजबूत तटबंदी, प्रचंड बुरुज आणि निसर्गाशी एकरूप झालेली रचना यामुळे हा किल्ला अभेद्य होता. इतिहासाच्या साक्षीदार असलेल्या या भव्य किल्ल्यात पाऊल ठेवताच भूतकाळ जागा होतो. समुद्राच्या लाटांशी लढा देत आजही तो आपल्या वैभवशाली पराक्रमाची गाथा सांगत उभा आहे. ३२ गाड्यांचा खा. शरद पवार यांनी उल्लेख केला असून या यादीतील निवडक एक्सप्रेस गाड्यांना कुडाळ, कणकवली किंवा सावंतवाडी स्थानकांवर थांबे देण्यात यावे असे ते म्हणाले.

## हायकोर्टाने हैदराबाद गॅझेटियरसंदर्भात

१९९४ साली शरद पवारांनी आमच्या हक्काचं १६ टक्के आरक्षण ओबीसींना दिलं आणि आमचे वाटोळे केले, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी शरद पवार यांच्यावर केला. याबाबत विचारले असता लक्ष्मण हाके म्हणाले की, जरांगेला यातले काही कळत नाही आणि त्यावेळी शरद पवार मुख्यमंत्री होते हा योगायोग आहे. वास्तविक पवारांचा मंडल आयोगाशी काही संबंध नाही, अशी टीका त्यांनी केली.

लक्ष्मण हाके पुढे म्हणाले म्हणाले की, तातडीने प्रतिज्ञापत्र सादर करता येत नसेल तर सुप्रीम कोर्टात पुन्हा निवडणूक लांबणीवर टाकण्यासाठी याचिका दाखल करा. मात्र ओबीसी आरक्षणाशिवाय पंचायत राजच्या निवडणुका घेणे समस्त ओबीसी समाजावर अन्यायकारक होईल, असेही त्यांनी म्हटले. राज्यातील ओबीसी नेते आता यावर बोलू लागले आहेत. मात्र, मी अडीच वर्षापासून या विरोधात लढत असताना हे नेते मताच्या भीतीने गप्प बसले होते.

## सप्टेंबरचा जीआर रद्द

निर्णयानुसार प्रमाणपत्र न देण्याची मागणी देखील उच्च न्यायालयाने फेटाळली आहे.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी झालेल्या ओबीसीच्या बैठकीत मंत्री छगन भुजबळ यांनी पुन्हा एकदा नाराजी जाहीर केली होती. विधी आणि न्याय विभागाची परवानगी न घेता हैदराबाद गॅझेटच्या संदर्भात तुम्ही शासन निर्णय कसा काढला असा प्रश्न भुजबळांनी मुख्यमंत्र्यांना विचारला. अनेक ठिकाणी खाडाखोड करून, नोंदी बदलून कुणबी प्रमाणपत्र काढली जात असल्याचा दावा देखील त्यांनी केला होता. त्यावर, मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या निर्णयावरून ओबीसी समाजात निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यात आला असून, बनावट प्रमाणपत्रे देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल आणि त्यांनाच जबाबदार धरले जाईल, असे आश्र्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### दिवाळीच्या मुहूर्तावर व्हिक्टोरियस कारचे पुण्यात शानदार लोकार्पण






**पुणे/प्रतिनिधी :** मारुती सुझुकीच्या व्हिक्टोरियस या नव्या कारचे लोकार्पण आज पुण्यातील आंबेगाव येथील शोरूममध्ये दिमाखदार सोहळ्यात संपन्न झाले. दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर झालेल्या या कार्यक्रमात सिने अभिनेत्री आशु सुरपुर व अभिनेता यातीन कारेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे आयोजन सचिन ओमप्रकाश किंगर, शोरूमचे मॅनेजर अभिजित चैबुरकर, किरण घोलप, व चैगुले इंडस्ट्रीजचे मालक यांच्या संयुक्त पुढाकाराने करण्यात आले होते.

अभिनेत्री आशु सुरपुर यांनी नवीन व्हिक्टोरियस कारचे कौतुक करताना सांगितले, ''ही कार केवळ सुंदरच नाही तर लुक आणि फीचर्सच्या बाबतीतसुद्धा अतिशय आकर्षक आहे. कार खरेदीच्या विचारात असलेल्यांनी एकदा तरी आंबेगाव शोरूमला भेट द्यावी आणि व्हिक्टोरियस कारची अनुभूती घ्यावी.''

या प्रसंगी उपस्थित मान्यवर आणि ग्राहकांनी नवीन मॉडेलची पाहणी करून समाधान व्यक्त केले. शोरूममध्ये दिवाळीच्या पार्श्वभूमीवर खास ऑफर्स आणि सवलतींचाही लाभ घेता येणार आहे.

### भारतीय सैन्याने मल्याळम सुपरस्टार मोहनलाल यांना सन्मानित केले:अभिनेत्याने आभार व्यक्त केले, म्हणाला- मला खूप आनंद आणि अभिमान वाटतोय



**मुंबई/प्रतिनिधी :** मल्याळम चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार मोहनलाल यांना आज लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी समाजात दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल आणि सशस्त्र दलांशी असलेल्या त्यांच्या सततच्या सहकार्याबद्दल सन्मानित केले.

खरं तर, मोहनलाल हे भारतीय प्रादेशिक सैन्यात लेफ्टनंट कर्नलची मानद पदवी मिळवणारे पहिले आणि एकमेव भारतीय अभिनेते आहेत. तथापि, मोहनलाल यांनी अभिनेता झाल्यानंतर २००९ मध्ये ही पदवी मिळवली. याशिवाय, अभिनेत्याने वर एक पोस्ट देखील शेअर केली आहे, ज्यामध्ये त्याने लिहिले आहे की, आज मला लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, , यांनी लष्कराच्या मुख्यालयात बोलावले होते, जिथे मला सात लष्करी कमांडर्ससमोर प्रशंसापत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

''मानद लेफ्टनंट कर्नल म्हणून हा सन्मान मिळाल्याबद्दल मी खूप नम्र आणि कृतज्ञ आहे. या सन्मानाबद्दल आणि त्यांच्या सततच्या पाठिंब्याबद्दल मी जनरल उपेंद्र द्विवेदी, संपूर्ण भारतीय सैन्य आणि माझ्या पालक युनिट, प्रादेशिक सैन्याचे मनापासून आभार मानतो.'' चित्रपट उद्योगातील योगदानाबद्दल मोहनलाल यांना हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात प्रतिष्ठित पुरस्कार दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना शाल आणि सुवर्ण कमळ पुरस्कार प्रदान केला. मोहनलाल यांना स्टँडिंग ओव्हेशन मिळाले.

मोहनलाल यांनी केवळ मल्याळमच नाही तर तमिळ, तेलगू, हिंदी आणि कन्नड चित्रपटांमध्येही काम केले आहे. त्यांनी १९८० च्या दशकात ''मंजिल विरिंजा पूक्कल'' या चित्रपटातून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली आणि ३५० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. मोहनलाल यांना यापूर्वी पाच राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना पद्मभूषण आणि पद्मश्रीनेही सन्मानित करण्यात आले आहे. चित्रपटसृष्टीतील त्यांच्या योगदानामुळे त्यांना ''द कम्प्लीट ॲक्टर'' ही पदवी मिळाली आहे.

### भरत नाही म्हणणाऱ्यांना खणखणीत चपराक, नाशिकच्या शेतकऱ्यांनी भरला तब्बल २१८ कोटींचा कर; सह्याद्री फार्म्सची राज्यात चर्चा

**नाशिक/प्रतिनिधी :** राज्यात सर्वत्र हाहाकार माजविणाऱ्या पावसाने बळीराजा हवालदिल झालाय. लाखो हेक्टर शेती वाहून गेलीय. शेकडो कोटी रुपयांची पिके जमीनदोस्त झालेत. पुन्हा एकदा स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी शेतकरी सरकारी मदतीकडे डोळे लावून बसलाय. याच परिस्थितीत नाशिकच्या शेतकऱ्यांनी मात्र सरकारच्या तिजोरीत कोट्यवधी रुपयांच्या कराचा भरणा करून शेतकरी आयकर भरत नाहीत, अशी ओरड करणार्यांना खणखणीत उत्तर दिले आहे.

# प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते आज राज्यातील विविध प्रकल्पांचे उद्घाटन

## नवी मुंबई विमानतळ, मेट्रो लाईन-३ आणि 'मुंबई वन' ॲपचा लोकार्पण सोहळा व कौशल्य अभ्यासक्रमांचा शुभारंभ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या (दि. ८ ऑक्टोबर) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन, मुंबई मेट्रो लाईन-३ च्या अंतिम टप्प्याचे राष्ट्राला समर्पण आणि 'मुंबई वन' या देशातील पहिल्या एकात्मिक कॉमन मोबिलिटी पचे लोकार्पण होणार आहे. त्याशिवाय, राज्यातील ४१९ आयटीआय आणि १४१ तांत्रिक संस्थांमध्ये २,५०६ बॅचेसच्या माध्यमातून नवीन अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम या उपक्रमाची सुरुवात प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

नवी मुंबई विमानतळाजवळील प्रांगणात होणाऱ्या या कार्यक्रमास राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री किंजरापु राममोहन नायडू, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, लोकसभा सदस्य श्रीरंग बारणे यांच्यासह लोकप्रतिनिधी व विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात नवे युग सुरू करणारा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा देशातील सर्वात मोठा ग्रीनफील्ड विमानतळ प्रकल्प ठरणार आहे. सिडको प्राधिकरण आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडच्या माध्यमातून हा विमानतळ सार्वजनिक-खासगी भागीदारी (झझझ) अंतर्गत उभारण्यात आला आहे. या विमानतळाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रधानमंत्री मोदी हे विमानतळावरील सोयी सुविधांची पाहणी करणार आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्यात १९,६४७ कोटींची गुंतवणूक करण्यात आली असून, १,१६० हेक्टर क्षेत्रावर उभारलेला हा विमानतळ दरवर्षी २० दशलक्ष प्रवासी व ०.५ दशलक्ष टन मालवाहतूक हाताळू शकतो. अंतिम टप्प्यात हे विमानतळ ९० दशलक्ष प्रवासी आणि ३.२५ दशलक्ष टन मालवाहतूक क्षमतेचे जागतिक दर्जाचे केंद्र बनेल.

दोन समांतर कोड-एफ रनवे, जलद बाहेर पडण्यासाठी टॅक्सीवे, अत्याधुनिक मालवाहतूक टर्मिनल, सौरऊर्जेवर आधारित ४७ मेगावॅटचा ऊर्जेचा पुरवठा आणि इलेक्ट्रिक बस सेवा ही या विमानतळाची वैशिष्ट्ये आहेत. तसेच, हा देशातील पहिला वॉटर टॅक्सीने जोडलेला विमानतळ असणार आहे.

या विमानतळावरुन डिसेंबर २०२५ मध्ये देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू होणार असून, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भारताच्या आधुनिक, हरित आणि जागतिक दर्जाच्या विमान वाहतूक पायाभूत सुविधेचे प्रतिक ठरणार आहे.

मेट्रो लाईन-३ (ॲक्वा लाईन) च्या अंतिम टप्प्याचे लोकार्पण

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतुकीत क्रांती घडवणाऱ्या ३३.५ कि.मी. लांबीच्या पूर्ण भूमिगत मेट्रो लाईन-३ च्या अंतिम टप्प्याचे आचार्य अत्रे चौक-कफ परेड मार्गाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते यावेळी लोकार्पण केले जाणार आहे.

एकूण २७ स्थानके असलेली ही लाईन दररोज १३ लाख प्रवाशांना सेवा देईल. दर पाच मिनिटांनी धावणाऱ्या आठ डब्यांच्या गाड्या प्रति तास ७२,००० प्रवासी वाहून नेतील. सायन्स सेंटर ते कफ परेड असा १०.९९ कि.मी.चा टप्पा १२,१९५ कोटी खर्चून बांधण्यात आला असून, हा मार्ग मंत्रालय, उच्च न्यायालय, आरबीआय, शेअर मार्केट, मरीन ड्राइव्हसारख्या आर्थिक व सांस्कृतिक ठिकाणांना जोडला जाणार आहे.

मुंबई मेट्रो लाईन ३ हा एकूण ३७,२७६ कोटी खर्चाचा प्रकल्प केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, जेआयसीए आणि एमएमआरसीएल यांच्या संयुक्त भागीदारीत राबविला गेला आहे. मुंबईकरांना जागतिक दर्जाची, हरित आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक प्रणाली देण्याच्या दिशेने हा निर्णायक टप्पा आहे.

'मुंबई वन' - भारतातील पहिले एकात्मिक कॉमन मोबिलिटी ॲप

मुंबई महानगरातील प्रवाशांना अखंड आणि सुलभ प्रवास अनुभव देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'मुंबई वन' या भारतातील पहिल्या एकात्मिक कॉमन मोबिलिटी ॲपचे अनावरण होणार आहे. हे ॲप उपनगरीय रेल्वे, मेट्रो लाईन्स, मोनोरेल, बेस्ट, टीएमटी, एनएमएमटी, केडीएमटी, एमबीएमटी, नवी मुंबई मेट्रो इत्यादी ११ सार्वजनिक वाहतूक ऑपरेटरशी जोडला जाणार आहे.



'मुंबई वन' द्वारे प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधा

एकाच क्यूआर कोडने मेट्रो, बस, रेल्वे, मोनोरेल प्रवासाचे तिकीट मिळेल.

त्रिभाषिक इंटरफेस (मराठी, हिंदी, इंग्रजी) असेल.

रिअल-टाइम ट्रेन/बस माहिती आणि प्रवासाचे नियोजन करता येईल.

प्रवाशाच्या स्थान शेअर करण्याच्या सुविधेबरोबरच आपत्कालीन परिस्थितीत संपर्काची यंत्रणा उपलब्ध

कॅशलेस व्यवहार व डिजिटल वॉलेट्स

पर्यटकांसाठी शहर मार्गदर्शक आणि आकर्षण स्थळांची माहिती

या ॲपमुळे प्रवाशांची अनेक ॲप्स वापरण्याची गरज संपेल, तिकीट रांगा कमी होतील आणि डिजिटल इंडिया उद्दिष्टांना चालना मिळेल.

कौशल्य भारतासाठी महाराष्ट्राचा पुढाकार - अल्पमुदतीचे एसटीईपी कार्यक्रम

आत्मनिर्भर आणि विकसित भारत या ध्येयाने प्रेरित होऊन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे 'अल्प कालावधीचे रोजगारक्षम कार्यक्रम' (ड्हींं-ढशीा एाश्रिूलळश्रळीं झीसीराश -डढएझ) या अभिनव कौशल्य उपक्रमाचा शुभारंभ करणार आहेत.

राज्यातील ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि १४१ शासकीय तांत्रिक विद्यालयांमध्ये एकूण २,५०६ नवीन बॅचेस सुरू होणार आहेत. या माध्यमातून ७५,००० प्रशिक्षणार्थ्यांना रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यात महिलांसाठी ३६४ विशेष बॅचेस आणि उदयोन्मुख क्षेत्रांसाठी ४०८ नवयुगीन तंत्रज्ञान अभ्यासक्रम बॅचेस (एआय, इंटरनेट ऑफ थिंग, ईलेक्ट्रिक व्हेइकल, सौर ऊर्जा, थरस्तर उत्पादन प्रक्रिया इ. अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

दादर येथील आयटीआय मध्ये सेमीकंडक्टर टेक्निशियन कोर्स, ग्रीन हायड्रोजन उत्पादन, आयटीआय गडचिरोलीतील ट्रॅक्टर मेकॅनिक ट्रेडसाठी १०० टक्के नोकरीची हमी, तसेच नाशिक येथे होणारा कुंभमेळा लक्षात घेऊन त्या काळात रोजगार निर्माण करणारे विशेष अभ्यासक्रम हे या उपक्रमाची वैशिष्ट्ये आहेत. सर्व अभ्यासक्रम २०० ते ४०० तासांचे, नॅशनल स्कील क्वॉलिफिकेशन फ्रेमवर्क (छडटऋ)-संबंधित असून यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य मंडळाचे प्रमाणपत्र देण्यात येतील. महिला आणि ग्रामीण तरुणांसाठी रोजगारक्षमतेचे दालन खुले करणारा हा उपक्रम आहे.

प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते नवी मुंबई विमानतळाचे लोकार्पण व उद्घाटनानंतर ते मुख्य समारंभस्थळी मेट्रो लाईन ३, वन मोबाईल पचे लोकार्पण व कौशल्य विकास कार्यक्रमांचा शुभारंभ करणार आहेत. त्यावेळी ते जाहीर सभेत नागरिकांना मार्गदर्शन करणार आहेत.

## रामायण या पवित्र ग्रंथाची निर्मिती करणारे भगवान श्री महर्षी वाल्मीकी ऋषी हे महान आद्यकवी : गुणवंत एच.मिसलवाड

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** आपल्या या भारत देशामध्ये, जगामध्ये मानव कल्याणासाठी अनेक संत, महंत, ऋषी मुनी होवून गेले. त्यापैकीच एक म्हणजे ५५०० वर्षापूर्वी त्रेतायुगात भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांनी रामायण घडण्याअगोदर रामायण या पवित्र ग्रंथाची निर्मिती करणारे महान आद्यकवी म्हणजेच भगवान श्री महर्षी वाल्मीकी ऋषी हे होत असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा. श्री गुणवंत एच.मिसलवाड यांनी केले.



ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि.०७ ऑक्टोबर २०२५ मंगळवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता रघुकुल रित सदा चली आए, प्राण जाए पर वचन न जाए, रामायण महाकाव्य रचनाकार, संस्कृतचे आद्यकवी भगवान श्री महर्षी वाल्मीकी ऋषी यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली. या जयंती निमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रम सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

सर्वप्रथम सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक मा.श्री.विष्णु हारकळ यांच्या हस्ते भगवान श्री महर्षी वाल्मीकी ऋषी यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रमुख वक्ते म्हणून बोलताना ते पुढे आपल्या भाषणात म्हणाले की, भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांची २४ हजार श्लोक, ७ अध्यायामध्ये रामायण या ग्रंथाची रचना केली असून पौराणामध्ये चार वेद, ६ शास्त्र, १८ पुराणापैकी रामायण हा एक ग्रंथ असून याच ग्रंथावर आधारीत प्रभू श्रीरामाच्या जीवनातील कालक्रमानुसार बालकांड, आयोध्या कांड, अरण्य कांड, सुंदर कांड, युद्ध कांड, उत्तर कांड अशा सहा भागामध्ये विभागले गेले असून आज घडीला आपण सर्वांनीच तुम्ही-आम्ही सर्वजण भगवान श्री महर्षी वाल्मीकी ऋषी यांचा आदर्श घेवून समाजाप्रती-देशाप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज असल्याचेही ते शेवटी यावेळी म्हणाले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून बसस्थानक प्रमुख यासीन हमीद खान, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक विष्णु हारकळ, चार्जमन संदीप बोधनकर, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, पाळी प्रमुख कैलास वाघमारे, संजय खेडकर, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, सुरेश फुलारी, संजय मंगनाळे, शिवचरण मळगे, उत्कृष्ट छायाचित्रकार केशव टोणगे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास रामप आगारातील कष्टकरी, कामगार-कर्मचारी, बंधू-भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

### गौतमी पाटीलचा इंदापुरातला शो बंद पडणार; गनिमी कावा सेवा संघटनेचा इशारा

**इंदापूर/प्रतिनिधी :** प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील हिचा मंगळवारी इंदापूरमध्ये होणारा कार्यक्रम बंद पाडण्याचा इशारा गनिनी कावा संघटनेने दिला आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातील नवले पुलाजवळ गौतमी पाटीलच्या कारचालकाने एका रिक्षाला धडक दिली होती. यामध्ये रिक्षाचालक गंभीर जखमी झाला होता. यानंतर गौतमी पाटील हिचा कारचालक घटनास्थळावरुन पळून गेला होता. या प्रकरणामुळे गौतमी पाटील ही अडचणीत सापडली होती. अपघाताच्यावेळी गौतमी पाटील कारमध्ये होती, असा आरोपही झाला होता. मात्र, पोलीस तपासानंतर ती गाडीत नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पुणे पोलिसांनी दिला क्लीन चिट दिली होती. मात्र, यानंतरही संबंधित रिक्षाचालकाचे नातेवाईक आक्रमक आहेत. अशातच गनिमी कावा संघटनेने या वादात उडी घेत गौतमी पाटील हिला इशारा दिला आहे. या संघटनेकडून मंगळवारी पुण्यातील बालगंधर्व नाट्यमंदिरासमोर आंदोलन करण्यात आले. गौतमी पाटील हिने पुण्यात येऊन पीडित रिक्षाचालकाची भेट घेतली पाहिजे. गौतमी पाटील हिला अद्याप तिची नैतिक जबाबदारी समजलेली नाही. तिने जखमी रिक्षाचालकाची भेट न घेतल्यास आम्ही इंदापूरमधील तिचा आजचा कार्यक्रम होऊ देणार नाही, असा इशारा गनिमी कावा संघटनेकडून देण्यात आला.

## आमची घरं उद्ध्वस्त केली तर आम्हीही मागे लागणार, छगन भुजबळ यांच्यामुळे ओबीसी उद्ध्वस्त होणार; मनोज जरांगेंचा हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणाच्या जीआरच्या विरोधात राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. यानंतर गेल्या काही दिवसांपासून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि मंत्री छगन भुजबळ यांच्यात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. सोमवारी छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे पाटलांचा अभ्यास किती? त्याचं शिक्षण काय? तो मराठ्यांचा लीडर नाही, असे म्हणत जोरदार हल्लाबोल केला होता. आता मनोज जरांगे पाटील यांनी छगन भुजबळांवर टीकास्त्र डागले आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषदेत मनोज जरांगे पाटील यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले. मनोज जरांगे वारंवार भडकावू भाषण करत आहे. राज्य सरकारने मनोज जरांगेंवर गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी केली आहे. याबाबत विचारले असता मनोज जरांगे पाटील म्हणाले की, छगन भुजबळ ज्ञानेश्र्वरी सांगतो का? अंबाडा येथे कोयते काढू म्हणाला होता. त्याच्यावर गुन्हे दाखल करा. भडकावू भाषण तुम्ही केलं. जातीवाद डोक्यात असल्याने मराठ्यांवर अन्याय केला. १९९० मध्ये माधव पॅटर्न आणला. मराठ्यांना त्रास द्यायचा होता. अन्याय करणाऱ्यांना अंगावर घ्याव लागते आणि मी घेणार आहे, असे आव्हान त्यांनी दिले.

राज्य सरकार ओबीसी किंवा इतर समाजाच्या नेत्यांवर गुन्हे दाखल करते मग मनोज जरांगेंवर का नाही?





असा सवाल उपस्थित करत राज्य सरकारची ही भेदभावपूर्वक भूमिका योग्य नसल्याची खंत बबनराव तायवाडे यांनी व्यक्त केली. याबाबत विचारले असता मनोज जरांगे पाटील म्हणाले की, तुम्ही तसे वागतात म्हणून गुन्हे दाखल करतात. हे लोक ओबीसी नेते नाही. ते एक जातीचे नेते आहे. मी जो आरोप केला तोच आरोप भुजबळ करतो. अंतरवाली येथे शांततेत आंदोलन सुरू असताना कोयते काढायची भाषा आम्ही केली नाही. तुम्ही बोलला तर आम्ही सोडणार नाही. मतदानासाठी मार खाऊन जगायचं का? असा सवाल यावेळी मनोज जरांगे पाटलांनी उपस्थित केला.

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, आमची घरं उद्ध्वस्त केली तर आम्हीही मागे लागणार आहोत. भुजबळांमुळे ओबीसींचं वाटोळं होणार आहे. आम्ही मराठे म्हणतो, ओबीसी आमचेच मात्र ते काहीच म्हणत नाही. प्रत्येकाचे काचेचे घर आहे हे लक्षात ठेवा. त्या पवार साहेबांनी मराठ्यांना आरक्षण दिलं असतं तर बरं झालं असते. जशास तसे आता वागावेच लागेल आणि आम्ही वागू. त्यांना धडा शिकवू. आता मराठा समाजाने समजून घ्यावे. आता माघार नाही, असे म्हणत त्यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला.

दरम्यान, मनोज जरांगे सध्या ज्या रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्या ठिकाणी अचानक पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आलेला आहे. दोन अधिकारी, दहा पेक्षा अधिक कर्मचारी २४ तास तैनात करण्यात आले आहेत. दोन महिला कर्मचाऱ्यांचा देखील यात समावेश आहे. गेल्या दोन दिवसांपासून ओबीसी नेते आणि मनोज जरांगे यांच्यामध्ये टोकाची टीका होत आहे. यामुळे कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांच्या वतीने दक्षता घेतली जात आहे.

# शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली

## ■ रविकांत तुपकर यांची सरकारच्या पॅकेजवर तीव्र प्रतिक्रिया
## ■ सरकारने हेडलाईन्स मॅनेजमेंटचं काम केलं आहे: तुपकर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री यांनी आज जाहीर केलेल्या ३१ हजार ६२८ कोटी रुपयांच्या मदत पॅकेजवर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ''सरकारने आकडे फुगवून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत,'' अशा शब्दांत त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली.

तुपकर म्हणाले, ''राज्यातील शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत बिकट आहे. अनेक ठिकाणी जमीन खरडून गेली आहे, सोयाबीन, कापूससह सर्व पिके वाहून गेली आहेत. अशा वेळी सरकारने केवळ आकड्यांचा खेळ केला आहे.

तुपकर पुढे म्हणाले, ''शेतकऱ्यांना ५० हजार रुपये हेक्टरी मदत अपेक्षित होती, मात्र सरकारने केवळ १८,५०० रुपयांची मदत जाहीर करून शेतकऱ्यांची थट्टा केली आहे. यापूर्वी ८,५०० रुपये मिळत होते, आता केवळ १० हजार रुपये वाढवून आकडा १८,५०० केला आहे, आणि त्यावर एवढा गाजावाजा केला जातोय हा प्रकार दिशाभूल करणारा आहे. केंद्राकडून निधी मिळाला नाही का? आणि मिळाला असेल तर एवढी तोकडी मदत का दिली गेली?''

सरकारवर ''हेडलाईन्स मॅनेजमेंट'' केल्याचा आरोप करत तुपकर म्हणाले, ''३१,६२८ कोटींचं पॅकेज म्हणजे केवळ फुगवलेला आकडा आहे. जर ३८ लाख हेक्टर नुकसानीचा विचार केला, तर प्रत्यक्षात सुमारे १७ हजार कोटी रुपयांचीच मदत होते. मग उर्वरित रक्कम कुठे गेली? दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात किती पैसे प्रत्यक्ष जमा होणार आहेत, हे सरकारने स्पष्टपणे सांगावं.''

जनावरांसाठी जाहीर केलेल्या ३७ हजार रुपयांच्या मदतीवरही तुपकरांनी संताप व्यक्त केला. ''आजच्या बाजारभावानुसार ३७ हजारांत कोणतं जनावर मिळतं? विहीर बांधकामासाठी किमान ५ लाख रुपये लागतात आणि सरकार फक्त ३० हजार देतं ही मदत नव्हे, ही शेतकऱ्यांची टिंगल आहे,'' असं ते म्हणाले. पिकविमा योजनेबाबत बोलताना तुपकर म्हणाले, ''सरकार पिकविम्याचे तीन ट्रिगर रद्द करून कापणी प्रयोगावर आधारित विमा देणार असल्याचं सांगतं. पण जेव्हा पिकच शिल्लक नाही, तेव्हा प्रयोग करणार कुठे? हे तर शेतकऱ्यांना आणखी हवालदिल करण्याचं काम आहे.''

सरकारवर भांडवलदारांचा पाठीशी ठेवण्याचा आरोप करत तुपकर पुढे म्हणाले, ''सरकारकडे कोट्यवधींच्या कंत्राटांसाठी पैसा आहे, पण कर्जमाफीसाठी नाही. भांडवलदारांच्या घशात कवडीमोल भावाने शेतजमिनी घातल्या जात आहेत. त्या जमिनींचं ऑक्शन करून निधी उभा करा आणि शेतकऱ्यांची कर्जमाफी करा. सरकारचं शेतकऱ्यांवरील प्रेम हे पुतणामावशीचं प्रेम आहे.'' मुख्यमंत्री म्हणाले १० हजार कोटी ग्रामीण साठी देणार त्यांचं वर्गीकरण सांगितले पाहिजे आकड्यांचा खेळ नको, साठी ६ हजार कोटी सरकार देत आहे ही मदत अत्यंत तोकडी आहे राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला अशा पध्दतीची आहे

कर्ज पुनर्गठनाच्या धोरणावर भाष्य करत तुपकर म्हणाले, ''कर्ज पुनर्गठनाच्या नावाखाली सरकार



शेतकऱ्यांची संख्या कमी करून कर्जमाफीतील पात्रता कमी करत आहे. चालू कर्ज करून थकीत शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाईल आणि पुनर्गठन केलेल्या शेतकऱ्यांना वगळलं जाईल. हा सरकारचा छुपा अजेंडा असून, त्याद्वारे शेतकऱ्यांना आणखी कर्जाच्या खाईत ढकललं जात आहे.''

तुपकरांनी शेवटी इशारा दिला की, ''जर शेतकऱ्यांवरील हा अन्याय सुरूच राहिला, तर येत्या काळात आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू. सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केवळ घोषणा नव्हे, तर प्रत्यक्ष मदत देऊन दाखवावी, अन्यथा जनतेचा रोष ओढवून घ्यावा लागेल.''

## सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याचा कोल्हापुरात निषेध; इंडिया आघाडीची निदर्शने

**कोल्हापूर/प्रतिनिधी:** सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर वकील राकेश किशोर यांनी केलेल्या हल्ल्याचे पडसाद मंगळवारी देशभरात उमटत आहेत. कोल्हापुरात इंडिया आघाडीच्या वतीनं शिवाजी चौकात निदर्शने करण्यात आली. 'मोदी सरकार चले जाओ', 'हल्ला करणाऱ्या मनुवादी विचारसरणीचा धिक्कार असो' अशा घोषणांनी इंडिया आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला.

भारतीय न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च स्थान असलेल्या सर्वोच्च न्यायालयात एका सुनावणीदरम्यान वकील राकेश किशोर यांनी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर वस्तू भिरकावल्याचा प्रकार सोमवारी घडला. या घटनेच्या विरोधात देशभरात प्रचंड संतापाची लाट पसरली आहे. राज्यातील विविध पक्षांनी या घटनेचा धिक्कार केला. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष यांनी राज्यात ठिकठिकाणी निषेध दर्शवून केंद्रातील भाजपा सरकारवर टीकेची जोड उठवली आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ इंडिया आघाडीच्या वतीनं शिवाजी चौकात निदर्शनं करण्यात आली. यावेळी केंद्र सरकार आणि मनुवादी विचार जोपासणाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. तर सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मातोश्रींनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाला जाण्यास नकार दिल्याच्या रागातूनच वकील राकेश किशोर यांनी हा प्रकार केल्याचा दावा कम्युनिस्ट पक्षाचे माजी राज्यसचिव उदय नारकर यांनी केला. ''कोल्हापुरात सर्किट बेंच स्थापन करण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यामागं संपूर्ण देश खंबीरपणे उभा आहे. छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार दडपण्याचा प्रकार सहन केला जाणार नाही,'' असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहसंपर्क प्रमुख विजय देवणे यांनी दिला. यावेळी कम्युनिस्ट पक्षाचे माजी सचिव उदय नारकर, माजी महापौर आर. के. पवार, भारती पवार, डी. जी. भास्कर, सुभाष देसाई, कॉम्रेड चंद्रकांत यादव, रघुनाथ कांबळे, विशाल देवकुळे, राजू यादव यांच्यासह इंडिया आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## वरुड येथे सक्षम वेलफेअर सोसायटीच्या वतीने ग्रामोत्सव उत्साहात साजरा




दैनिक आपला विदर्भ

**वरूड/प्रतिनिधी** : वरूड येथे दिनांक २३ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत नवरात्री निमित्ताने सक्षम वेलफेअर सोसायटीच्या वतीने ग्रामोत्सव मोठ्या उत्साहात आणि सामाजिक सहभागाने साजरा करण्यात आला.

ग्रामोत्सवाच्या निमित्ताने नियमित ध्यान, सामुदायिक प्रार्थना, देवीचा गोंधळ आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यासोबतच विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि सांस्कृतिक उपक्रमांनी ग्रामस्थांचा उत्साह द्विगुणीत झाला.

ग्रामोत्सवात रक्तदान शिबिर, मुलांसाठी फुगा दौड, बिस्कीट खाणे, चित्रकला, नृत्य स्पर्धा, महिलांसाठी रांगोळी, उखाणे, गर्भा नृत्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

समाजप्रबोधनासाठी राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. रामपाल धारकर व गणेश महाराज चांदेवार यांची कीर्तनरूपद्वारे विचारप्रवर्तक सादरीकरण करण्यात आली. ''स्वस्थ नारी, सशक्त परिवार'' या अभियानांतर्गत रोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये २०० हून अधिक ग्रामस्थांनी सहभाग घेत आरोग्य तपासणी करून औषधोपचार घेतले.

ग्रामोत्सव यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अमोल कुकडे, संचिता खंडारे, अजय अंबुलकर, किरण परचाके, रोशन तिवरे, पीयुष देऊळकर, नितीन ठाकरे, जगदीश डोळसकर यांचे विशेष योगदान लाभले.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाचा मोठा निर्णय : व्याज परताव्यासोबतच आता उद्योजकता प्रशिक्षण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या तरुणांना सक्षम उद्योजक बनविण्यासाठी कार्यरत असलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने एक महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. महामंडळ आता केवळ बँक कर्जावरील व्याज परतावा योजनाच नव्हे, तर लाभार्थ्यांना व्यवसायासाठी आवश्यक उद्योजकता प्रशिक्षण आणि मार्गदर्शन देखील देणार आहे.

हा निर्णय तरुण उद्योजकांना केवळ आर्थिक मदत न देता, त्यांना व्यवसाय यशस्वीपणे चालवण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये मिळवून देण्याच्या उद्देशाने घेण्यात आला असल्याची माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी दिली. या उपक्रमाचा भाग म्हणून महामंडळाच्या वतीने 'उद्योग सारथी' प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत २४ सप्टेंबर २०२५ रोजी ऑनलाईन वेबिनार आयोजित करण्यात आले.

या वेबिनारमध्ये 'पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय' या विषयावर पुणे कृषी विद्यालयाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम युट्युब आणि फेसबुकवर थेट प्रसारित करण्यात आला. वेबिनारदरम्यान डॉ. माने यांनी दुग्ध व्यवसायातील यशस्वीतेसाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर प्रकाश टाकला. त्यांनी उत्तम जातीच्या जनावरांची निवड, आहार नियोजन, आरोग्य व लसीकरण, तसेच आर्थिक व्यवस्थापन आणि विपणन तंत्र यावर सखोल माहिती दिली. तसेच, गीर, साहिवाल, जर्सी यांसारख्या देशी व विदेशी जातींचे फायदे, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे उत्पादन व व्यवस्थापनात होणारी सुधारणा याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. माने यांनी सांगितले की, ''दुग्ध व्यवसाय हा केवळ उत्पन्नाचा स्रोत नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा एक महत्त्वाचा घटक आहे. योग्य प्रशिक्षण, नियोजन आणि शाश्वत व्यवस्थापनामुळे हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात यशस्वी होऊ शकतो.'' या वेबिनारमध्ये राज्यभरातून अनेक युवक, महिला उद्योजिका आणि स्वयंसहायता गट प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला. लाभार्थ्यांनी थेट प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन केले.

पुढील काळात राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये अशा ऑनलाईन प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असून, तज्ञांच्या मार्गदर्शनातून तयार झालेले उद्योजक आपला व्यवसाय अधिक सक्षमपणे वाढवतील, असा विश्वास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी व्यक्त केला.

## बीडच्या नागरिकांसाठी आनंदाची बातमी, रेल्वेपाठोपाठ विमानही लँड होणार

**बीड/प्रतिनिधी:** बीडच्या नागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. रेल्वे सुरू झाल्यानंतर आता बीडमध्ये विमानही लँड होणार आहे. यासाठी प्रशासनाने कामखेडा परिसरात प्रस्तावित विमानतळासाठी जागा निश्चित केली आहे. एअरपोर्ट प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन या संस्थांच्या अधिकाऱ्यांनी कामखेडा परिसराची पाहणी केली.

## नागरे महाविद्यालयात अभिजात भाषा सप्ताह प्रारंभ

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : स्थानिक दुसरबीड काही दि.७ नारायणराव नागरे महाविद्यालयात मराठी अभिजात भाषा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉक्टर विजय नागरे सर (अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य अमरावती विद्यापीठ अमरावती)तर प्रमुख पाहुणे म्हणून ह भ प विश्वनाथ महाराज जायभाये चोरपांग्रेकर उपस्थित होते. प्राध्यापक भगवान शिंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व प्रमुख पाहुण्यांनी आपल्या अभिजात मराठी भाषेला




कसे समृद्ध करावे याबद्दल उत्तम मार्गदर्शन केले.

तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय प्राचार्य डॉक्टर विजय नागरे सर यांनी आपली मराठी इतर भाषेपेक्षा कशी आगळीवेगळी आहे?कशी समृद्ध आहे, आणि तिचा विकास कशा पद्धतीने झाला याचा इतिहास सांगितला आणि मराठी भाषा ही अभिजात केव्हा बनली याविषयी विस्तृत माहिती देऊन संत ज्ञानेश्वर महाराज ,संत नामदेव महाराज, संत चोखामेळा, संत एकनाथ महाराज यांच्या विविध उदाहरणातून आणि दृष्टांतातून मराठी वर आईसारखे प्रेम करण्यासाठी आवाहन केले.

यावेळी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. भगवान शिंदे सर, प्रा. डॉ. गणेश घुगे, प्रा. तारे सर, प्रा. जगदीश यादव सर ,प्रा. मिलिंद गवई, प्रा. देवानंद नागरे प्रा.शंकर मेहेर, प्रा. पोखरकर सर तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये श्री गजानन कायदे अनिल गायकवाड, अनिल रणमळे, भाऊराव पंढरे, आणि महाविद्यालयीन विद्यार्थी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महेर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.जगदीश यादव यांनी केले.

## विविध वृत्त...

### कै.वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलांडे यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** कै.वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलांडे (पाटील) हे बुधवार दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दुपारी २ वाजता सिंदखेड राजा येथील विश्रामगृह येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या, चारा लागवड व अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान व करण्यात आलेली मदत यासंबंधी बैठक, दुपारी ३ वाजता शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट, दुपारी ४.१५ वाजता देऊळगाव राजा येथील विश्रामगृह येथे अधिकाऱ्यांसमवेत बैठक, साय. ५ वाजता शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट, सायं. ५.४५ वाजता सिंदखेड राजा मार्गे अमरावतीकडे प्रयाण करतील.

### महर्षी वाल्मिकी यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महर्षी वाल्मिकी यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, तहसीलदार वृषाली केसकर, विजय सवडे, प्रमोद करे, जिल्हा नाझर गजानन मोतेकर यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### नाशकात निवृत्त महिला अधिकाऱ्याची निर्घृण हत्या, पोटच्या मुलानेच पाडले रक्ताच्या थारोळ्यात

**नाशिक/प्रतिनिधी:** नाशिक शहर पुन्हा एकदा हत्येच्या घटनेने हादरले आहे. आज पहाटे नाशिक शहरात एका तरुणाची देवदर्शनाला जाताना हत्या करण्यात आली होती. हत्येची ही घटना ताजी असताना अवघ्या पाच तासांत नाशकात हत्येची दुसरी घटना घडली आहे. इथं एका तरुणाने आपल्या जन्मदात्या आईवर चाकुने वार करून हत्या केली आहे. एकाच दिवसात शहरात अशाप्रकारे हत्येच्या दोन घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

मंगला घोलप असे हत्या झालेल्या ४५ वर्षी महिलेचं नाव आहे. त्या सेवानिवृत्त विस्तार अधिकारी असल्याची माहिती समोर येत आहे. मंगला घोलप यांचा मुलगा स्वप्नील घोलप याने आपल्या आईवर धारदार शस्त्राने वार करत त्यांची हत्या केली. घटनेची माहिती मिळताच सातपूर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून तात्काळ आरोपी स्वप्नील घोलप यास ताब्यात घेतले आहे. आईच्या खुनाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सातपूर पोलीस सध्या गुन्हा नोंद करण्याचे काम करत असून, या घटनेमागील नेमके कारण आणि तपशीलवार तपास करत आहेत. अवघ्या काही तासांत दोन खुनामुळे नाशिकमधील कायदा आणि सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाढत्या गुन्हेगारीवर तातडीने नियंत्रण मिळवण्याचे आव्हान पोलीस प्रशासनासमोर उभे राहिले आहे. विशेष म्हणजे गेल्या काळात नाशिक शहरासह आसपासच्या परिसरात हत्येच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागल्या नऊ महिन्यातील ही ४५ वी हत्या आहे. त्यामुळे शहरात नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होताना दिसत आहे. या वाढत्या गुन्हेगारीवर वचक ठेवण्यासाठी आता पोलीस काय पावलं उचलणार ? हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

### अक्षय कुमारमुळे महाराष्ट्रातील पोलिसांच्या गणवेशात बदल होणार ? काय म्हणाले मुख्यमंत्री ?

**मुंबई/प्रतिनिधी:** फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री म्हणजेच फिक्की या संस्थेसाठी बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीत एका प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री पोलिसांच्या बुटांविषयी बोलले. यामुळे राज्यातल्या पोलिसांच्या गणवेशात बदल होणार असल्याच्या चर्चेने जोर धरला आहे.

मुख्यमंर्त्यांशी बोलताना मुलाखती दरम्यान अक्षय कुमारने पोलिसांच्या बुटांचा विषय उपस्थित केला. मुख्यमंत्री फडणवीस हेच राज्याचे गृहमंत्री पण आहेत. पोलीस विभाग थेट त्यांच्या नियंत्रणात आहे म्हणून अक्षय कुमारने पोलिसांच्या बुटांबाबत मुख्यमंर्त्यासमोर मुद्दा उपस्थित केला.